# को.ए.सो. गुलाबबाई रामनिवास अग्रवाल विद्यामंदिर व सरेमल प्रतापमल जैन उच्च माध्यमिक शाळा, नागोठणे

अहवाल वर्षी एस.एस.सी. मार्च २०१६ चा निकाल ९४.६०% लागला कु.वाघ प्रसन्न सुभाष हा ९०.६०% गुण मिळवून प्रथम आला कु. देवकते ऋतुजा नानासाहेब हिने ८८.००% गुण मिळवून द्वितीय क्रमांक प्राप्त केला. एच.एस.सी. परीक्षेत कला विभागाचा निकाल ५२.६८% लागला असून कु. घासे योगेश मधुकर व कु. घासे दिप्ती रमेश हे विद्यार्थी ६५.५३% गुण मिळवून प्रथम आले. वाणिज्य शाखेचा निकाल ८२.८१% लागला व कु. भोईर पुजा वसंत हिने ७८.७६% गुण मिळवले. विज्ञान शाखेचा निकाल ७६.८७% लागला यामध्ये कु. भोगे युगेश जिवराम यास ८६.४६% गुण मिळाले. उच्च माध्यमिक विभागाचा एकूण निकाल ७२.८४% लागला.

शैक्षणिक वर्षात सप्टेंबर २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट या चित्रकला परीक्षांचा निकाल ९७.६६% लागला विद्यार्थ्यांना कला शिक्षक श्री. एस.ए.दाभाडे यांनी मार्गदर्शन केले.

को.ए.सो. आंतरशालेय वाक्स्पर्धेत ७ वी ८ वी गटात इंग्रजी विषयात कु. साहिल सुनिल गायकवाड हा १७२ गुण मिळवून प्रथम आला. या गटासाठी सर्वाधिक गुण मिळवून कै. सुहास काशिनाथ पाटील स्मृती ढाल पटकावली याच स्पर्धेसाठी ५ वी ६ वी गटासाठी कु. नाकते तनुजा सुरेश हिस हिंदी विषयात तृतीय तर सेवक पाल्यामध्ये कु. जाधव हर्षदा सूर्यकांत हिस द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. आंतरशालेय व महाविद्यालयीन निबंध स्पर्धेत ७ वी गटात कु. खानविलकर आकांक्षा दत्ता हिस मराठी विषयात प्रथम कु. महाडिक नेहा धनंजय हिस ९ वी गटात हिंदी विषयात द्वितीय तर ११ वी गटात कु. खोपकर ऐश्वर्या विकास हिस इंग्रजी विषयात द्वितीय, कु. घरट कृष्णाली दत्ताराम हिस मराठी विषयात द्वितीय व कु. मांजरे ओमकार महेंद्र यास हिंदी विषयात प्रथम क्रमांक मिळाला.

रा.जि.प. जिल्हास्तरावर घेण्यात आलेल्या स्वच्छता मित्र वक्तृत्व स्पर्धेत कु.घरट कृष्णाली दत्ताराम हिस प्रथम व महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ (विद्या समिती) यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला.

क्रीडा क्षेत्रात नागपूर येथे फेब्रुवारी २०१६ मध्ये झालेल्या राज्यस्तरीय वुडबॉल स्पर्धेसाठी कनिष्ठ महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांचा संघ पाठविण्यात आला. त्यात कु. संकेत ठाकुर, कु. भावेश भोईर, कु. कृतेश खाडे, कु. वरूण पाटील, कु. सिद्धेश घासे, कु. अनिकेत भोईर या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

दि. २२ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०१५ या कालावधीत शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन शाळासमिती सभापती मा.नरेंद्रजी जैन व को.ए.सो. प्राथमिक शाळा समिती सभापती मा. हरिषशेठ काळे यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून मा.एस.के. पटोदिया (सिनीअर व्हा.प्रेसिडेंट महाराष्ट्र सिमलेस लिमिटेड) उपस्थित होते.

शाळा व महाविद्यालयासाठी बांधण्यात येत असलेल्या नवीन तीन मजली इमारतीचे भूमिपूजन शाळेचे चेअरमन मा.श्री. नरेंद्र जैन यांच्या हस्ते झाले. या इमारतीचे बांधकाम पुर्णत्वाकडे वाटचाल करीत आहे.


कु. वाघ प्रसन्न सुभाष
एस. एस.सी. (९०.६०%)


कु. घासे दिप्ती रमेश
एच.एस.सी.-कला (६५.५३%)


कु. भांगे युगेश जिवराम
एच.एस.सी.-विज्ञान (८६.४६%)


कु. भोई पुजा वसंत
एच.एस.सी.-वाणिज्य (६७.७६%)


कु. घरट कृष्णाली दत्ताराम
(जिल्हास्थरीय वाक्स्पर्धेत यश)


शाळेच्या नवीन इमारतीचे भुमिपूजन करताना मा. चेअरमन साहेब व इतर मान्यवर


नागपूर येथील राज्यस्तरीय वुडबॉल स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा संघ